“नवनिर्मित ग्रामीण रुगणालय, सावदा जिल्हा जळगाव करीता आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.५२/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १५ मे, २०१९.

वाचा :

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१८/प्र.क्र.४०/भाग-२२ आ-३ दि. २३.०५.२०१८.**

२) **सह संचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांक- ससंआसे/कक्ष-३/टे-२/ग्रारुसावदा/आहरण व संवितरण अधिकारी/१०७१-७३/१९, दिनांक २०.०१.२०१९.**

प्रस्तावना:

नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय, सावदा या ३० खाटांच्या रुगणालयाकरीता उपरोक्त दिनांक २३.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दपनिर्मिती करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.२ च्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर रुग्णालयाकरीता, आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय, सावदा जि. जळगाव करीता वैदयकीय अधिक्षक (गट-अ) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात येत आहे.

२. शासन निर्णय, दि.१७ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द वित्तीय अधिकार नियम पुस्तिका नियम क्र.२ नुसार प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार वित्त विभागाच्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१०१११७३८७६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.05.15 11:28:49 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय राज्यस्तर) मुंबई.
५. सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष), मुंबई.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जळगाव.
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव.
८. वैदयकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, सावदा, जि.जळगाव.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.
१०.अवर सचिव, (अर्थसंकल्प) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).